

लईराई जत्रा; शेवटच्या दिवशी भाविकांना प्रवेश बंद पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



कोलकाताचा राजस्थानवर सनसनाटी विजय पान ४ वर

वेर्णा, सोमवार, ५ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 242 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 5 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### रशियाकडून भारताला मिळाली इग्ला-एस क्षेपणास्त्र

**नवी दिल्लीस दि. ४ :** पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत – पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराला रशियन बनावटीच्या इग्ला-एस या खांद्यावरुन चालवता येणाऱ्या हवाई संरक्षण क्षेपणास्त्रांचा नवा साठा (कन्साईनमेंट) मिळाला आहे. या क्षेपणास्त्रांमुळे जमिनीवर, जंगलात, बोटीत किंवा डोंगराळ भागात उभे राहून थेट विमानाचा किंवा हेलिकॉप्टरचा वेध घेणे शक्य आहे. केंद्राने सैन्याला दिलेल्या आपत्कालीन खरेदी अधिकारांतर्गत केलेल्या कराराचा भाग म्हणून इग्ला-एस क्षेपणास्त्रांचा नवीन पुरवठा प्राप्त झाला आहे. भारतीय लष्कराने २६० कोटी रुपयांत नव्या इग्ला-एस क्षेपणास्त्रांचा साठा खरेदी केला आहे. ही क्षेपणास्त्र दिवस असो वा रात्र, उन – पाऊस – वादळ – वारा अशा कोणत्याही वातावरणात आणि कोणत्याही वेळी शत्रुच्या विमानाचा किंवा हेलिकॉप्टरचा वेध घेण्यास सक्षम आहेत. भारतीय हवाई दलानेही आधुनिक इग्ला-एस क्षेपणास्त्रांचा साठा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. लष्कराने तर नवा साठा खरेदी करतानाच आणखी इग्ला-एस क्षेपणास्त्रांची ऑर्डर दिली आहे.

---

### योगगुरू स्वामी शिवानंद यांचे निधन

**वाराणसी, दि. ४ :**प्रसिद्ध योगगुरू आणि पद्मश्री पुरस्कार विजेते स्वामी शिवानंद सरस्वती यांचे रविवार ४ मे रोजी १२९ व्या वर्षी निधन झाले. ते तपस्वी जीवनशैली आणि आध्यात्मिक ज्ञानासाठी तसेच योग क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी प्रसिद्ध होते. पंतप्रधान मोदींसह सार्वजनिक जीवनातील अनेक दिग्गजांनी, शिवानंद सरस्वती यांच्या शिष्यांनी आणि स्थानिकांनी दिवंगत स्वामी शिवानंद सरस्वती यांना आदरांजली वाहिली.

स्वामी शिवानंद सरस्वती यांनी योग क्षेत्रात अतुलनीय कार्य केले शिवाय वंचितांसाठी आयुष्य वेचले. योग आणि मानवतावादी कार्यातील योगदानासाठी २०२२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले होते. स्वामी शिवानंद त्यांच्या साधेपणा, शिस्त आणि भक्तीसाठी ओळखले जात. आयुष्यभर त्यांनी स्वतःची कामं स्वतःचे करणे पसंत केले. ते १२९ व्या वर्षीही योगासने करत होते. स्वामी शिवानंद बाबा १२९ वर्षे जगले. आम्ही १९९८ पासून त्यांना भेटत होतो.

---

### राहुल गांधी हिंदू धर्मातून बहिष्कृत : शंकराचार्य

**देहरादून, दि. ४ :** ज्योतिर्मठ शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी लोकसभा विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांना हिंदू धर्मातून 'बहिष्कृत' केले आहे. राहुल गांधी यांनी संसदेत मनुस्मृतीवर भाष्य करताना 'सनातन धर्माचा अपमान' केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या संदर्भात तीन महिन्यांपूर्वी स्पष्टीकरण मागितले होते, पण राहुल गांधींनी उत्तर दिले नाही, असेही ते म्हणाले. बद्रीनाथ येथील शंकराचार्य आश्रमात ही घोषणा करण्यात आली. राहुल गांधी यांनी संसदेत भाषण करताना मनुस्मृती 'बलात्कार करणाऱ्यांचे संरक्षण करते' असे विधान केले होते. त्यानंतर शंकराचार्यांनी राहुल गांधी यांच्याकडून उत्तराची तीन महिने वाट पाहिली. त्यांनी राहुल गांधींना स्मरणपत्रही पाठवले, पण काहीच उत्तर आले नाही, असे ते म्हणाले.

---

### पाकिस्तानवर संपूर्ण आयातबंदी लागू

**नवी दिल्ली, दि. ४ :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारताने राष्ट्री सुरक्षेच्या मुद्द्यावर शनिवारी पाकिस्तानवर संपूर्ण आयातबंदी लागू केली. पाकिस्तानकडून हवाई, भूमार्गे किंवा अन्य मार्गांनी येणाऱ्या टपाल आणि पार्सल सेवांची देवाणघेवाणही तत्काळ बंद करण्याचा निर्णय भारताने घेतला. शिवाय पाकिस्तानी राष्ट्रध्वज लावलेल्या जहाजांना भारतीय बंदरांमध्ये प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आल्याने पाकिस्तानची आर्थिक कोंडी होणार आहे.

# राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांनी भेटून केले सांत्वन

## आज सादर होणार विशेष चौकशी समितीचा अहवाल

## जखमींच्या प्रकृतीत सुधारणा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**डिचोली, दि. ४ : लईराई देवीच्या यात्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत बळी गेलेल्या मृतांच्या कुटुंबियांचे सांत्वन राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई आणि मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी कुटुंबीयांना भेटून केले .**

गोव्याचे राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी सत्तरीतील पडोसे येथे मृत सूर्या नयेकर, थिवि येथील यशवंत केरकर, आदित्य कवठणकर, तनुजा कवठणकर, पिळगाव येथील सागर नंददुर्गी आणि खोरली येथील प्रतिभा कळंगुटकर यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. राज्यपालांसोबत थिविचे आमदार नीलकंठ हळर्णकर होते.

पत्रकारांशी बोलताना राज्यपाल म्हणाले की, मी कुटुंबियांना भेटण्यासाठी येथे आलो होतो. सहा जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत आणि ८० जण जखमी झाले आहेत. गोव्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारची चेंगराचेंगरी झाली आहे. पंतप्रधान आणि राष्ट्रपतींनी या घटनेबद्दल धक्का व्यक्त केला आहे. राष्ट्रपती आणि पंतप्रधानांच्या कुटुंबियांना सांत्वन देण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत.

राज्य सरकार वैद्यकीय आणि इतर बाबींची काळजी घेत आहे. काल मी रुग्णालयांना भेट दिली आणि डॉक्टरांशी बैठक घेतली. राज्य सरकारने जखमींना एक लाख रुपये आणि मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपये देण्याची घोषणा आधीच केली आहे, असे ते म्हणाले.राज्यपालांनी सांगितले की या घटनेची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.इतके लोक त्यांचे म्हणणे मांडत आहेत. राज्यपाल म्हणून मी सर्व पैलूंचा विचार करेन. ही एक दुर्दैवी घटना आहे आणि सध्या त्रास सहन करणाऱ्या कुटुंबांना मदत करण्यासाठी आम्ही एकत्र आहोत, असे ते म्हणाले.

दरम्यान, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी घोषणा केली की, चेंगराचेंगरीत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना जाहीर केलेली भरपाई १२ व्या दिवशी दिली जाईल. शिरगाव जत्रा चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्या सूर्या नयेकर यांच्या घरी भेट दिल्यानंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, चेक १२ व्या दिवशी दिला जाईल. इतर कोणत्याही मदतीची आवश्यकता असल्यास ती देखील दिली जाईल. मुख्यमंत्र्यांनी धोंड आणि प्रशासनाकडून सुव्यवस्थित करण्याच्या गरजेवर भर दिला.



### पडोसेच्या रहिवाशांनी दिली महत्त्वाची माहिती

**ही दुर्घटना नेमकी कशी झाली याबाबत अद्यापही कोणतीही ठोस माहिती हाती आलेली नाही. रहिवासी प्रवीण नाईक म्हणाले की, सुरुवातीला दोन रांगा होत्या पण नंतर रांगांची संख्या सहा झाली. यामुळे गर्दी वाढली. उतार असल्याने लोकांना खाली घसरण्यापासून स्वतःला रोखणे कठीण होत होते. लोक एकमेकांवर पडू लागले. अचानक मागून मोठा दबाव आला आणि लोक जमिनीवर पडू लागले. त्यामुळे रांगेच्या पुढच्या टोकावर असलेल्यांना सर्वात जास्त फटका बसला.चेंगराचेंगरीत सूर्या नयेकर आणि त्यांचा मुलगा पांडुरंग नयेकर अडकले. त्यांनी बाहेर येण्याचा प्रयत्न केला पण ते शक्य झाले नाहीत. तथापि, कोणीतरी पांडुरंगला धरले आणि त्याला बाहेर काढले, असे प्रवीण यांनी सांगितले. संदीप गावकर, हे आणखी एक रहिवासी म्हणाले की, घटना घडलेल्या ठिकाणापासून आम्ही फार दूर नव्हतो. मी एका रांगेत जाण्याचा प्रयत्न केला पण शक्य झाले नाही. म्हणून मी बसलो पण लवकरच मला लोक धावत असल्याचे दिसले. भांडण होऊ शकते असे वाटून मी काय झाले आहे ते पाहण्यासाठी गेलो. मला माझे लोक सापडले नाहीत. अचानक मला सूर्या पडलेला दिसला. मी त्याची नाडी तपासली. मी घाबरलो. काय करावे हे समजत नव्हते. नंतर आम्ही त्याला रुग्णवाहिकेतून म्हापसा येथे पाठवले. काय झाले ते मला माहित नाही पण मी तिथे पोहोचलो तेव्हा लोकांची संख्या कमी झाली होती आणि काही मृतदेह जमिनीवर पडले होते, असे गावकर म्हणाले. विश्रांती गावकर म्हणाल्या की, प्रशासनाने रस्त्याच्या कडेला इतके स्टॉल लावण्यास परवानगी देऊ नये आणि वीज कनेक्शन देखील तपासायला हवे होते.**

# तांदळाच्या दोन नवीन जातींचं लोकार्पण

**नवी दिल्ली, दि. ४ :**

मध्यप्रदेशचे कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दोन अत्याधुनिक जीनोम-संपादित तांदळाच्या जातींचं रविवारी लोकपर्ण केलं, जे भारतीय कृषी क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरलं आहे. या जाती हवामान-प्रतिरोधक, पाणी वाचवणाऱ्या आणि उत्पादन वाढवणाऱ्या गुणधर्मांनी संपन्न आहेत.या तांदळाच्या जातींना 'कमला' आणि 'पुसा तांदूळ १' असं नाव देण्यात आले आहे. या जाती अधिक ताण सहनशील, सुधारित उत्पादन आणि हवामान अनुकूलतेसाठी ओळखल्या जातात.

हैदराबादमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ राईस रिसर्च द्वारा विकसित केलेली 'कमला' जात, सध्याच्या 'सांबा महसुरी' जातीसोबत तुलनात्मकरीत्या जास्त उत्पादन, सुधारित दुष्काळ सहनशीलता आणि लवकर परिपक्वता देण्याचे आश्वासन देते.आयसीएआरच्या माहितीप्रमाणे, 'कमला' जात जीनोम एडिटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित केली गेली आहे. सायटोकिनिन ऑक्सिडेस २ जीनला लक्ष्य करून या जातीत धान्यांची संख्या वाढवली गेली आहे. या नवीन जातीने आपल्या मूळ जातीपेक्षा सुमारे २० दिवस आधी (सुमारे १३० दिवस) उत्कृष्ट उत्पादन क्षमता आणि दुष्काळ सहनशीलता दाखवली आहे.

'कमला' जाताची सर्वोत्कृष्ट कार्यक्षमता आणि उत्पादनाच्या दृष्टीने विविध राज्यांमध्ये लागवडीसाठी शिफारस करण्यात आली आहे. प्रमुख भात उत्पादक राज्यांमध्ये आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटका, तामिळनाडू, केरळ, छत्तीसगड, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि ओडिशा यांचा समावेश आहे.

आयसीएआर-इंडियन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट नवी दिल्ली यांच्या शास्त्रज्ञांनी विकसित केलेली ही नवीन जात 'पुसा तांदूळ १' आहे. या जातीत कोणताही परदेशी डीएनए समाविष्ट न करता दुष्काळ आणि मीठ सहनशीलता जनुकाला लक्ष्य करण्यात आलं आहे.पुसा तांदूळ १ ही जात पाणी, माती आणि हवामानाच्या विविध ताणतणावावर कार्यक्षम आहे. २०२३ आणि २०२४ दरम्यान शेतात घेण्यात आलेल्या चाचण्यांमध्ये या जातीत उत्पादनामध्ये पान २ ▶

# हत्येचा आरोपी रेल्वे डब्यात मृतावस्थेत

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ४ :** मडगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीत नोंदवलेल्या खून प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी एच. रफिक हा केरळमधील एका रेल्वे स्थानकावर डब्यात मृतावस्थेत आढळून आला आहे. रफिकवर उत्तर कन्नड कर्नाटकातील भटकळचे रहिवासी बशीर गुडू साब अहमद (वय ३८) यांच्या हत्येचा आरोप होता.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रफिक आणि मृत बशीर दोघेही एकमेकांना पूर्वीपासून ओळखत होते. हे दोघे काही कामानिमित्त मडगाव येथे आले होते व स्टेशन रोडवरील एका हॉटेलमध्ये थांबले होते. प्राथमिक तपासात असे उघड झाले आहे की, बशीर याला हॉटेलच्या दुसऱ्या मजल्यावरून खाली ढकलून रफिकने त्याची हत्या केली आणि नंतर पळून गेला.

मडगाव पोलिसांनी ३० एप्रिल रोजी ही घटना अनैसर्गिक मृत्यू म्हणून नोंदवली होती. मात्र, दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयाच्या कॅज्युअल्टी विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी अधिक चौकशी सुरू केली. या चौकशीत बशीर याचा मृतदेह हॉटेलजवळ सापडल्याची पुष्टी झाली. मृताची खोली आतून बंद असल्यामुळे सुरुवातीला आत्महत्येचा संशय व्यक्त करण्यात आला होता. परंतु शवविच्छेदन अहवालात मृताच्या शरीरावर जखमांचे निशाण आढळल्याने पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला.

पोस्टमॉर्टेम अहवालावरून मडगाव पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या नव्या बीएनएस २०२३ च्या कलम १०३ (१) अंतर्गत खुनाचा गुन्हा नोंदवला आहे. दरम्यान, आरोपी रफिक केरळकडे पलायन करत असताना रेल्वे डब्यात मृतावस्थेत सापडल्याचे कळते. केरळमधील स्थानकावर त्याचा मृतदेह आढळल्याची माहिती मडगावमध्ये दाखल झालेल्या रफिकच्या भावाने आणि मृताच्या कुटुंबीयांनी पोलिसांना दिली आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हत्येच्या संभाव्य कारणांचा शोध घेतला जात असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहेत. तसेच हॉटेलचे रजिस्टरही पोलिसांनी तपासले आहे. अधिक तपासासाठी मडगाव पोलिसांनी केरळमधील संबंधित स्थानिक पोलिस स्टेशनला पत्रव्यवहार केला आहे. पान २ ▶

# बोरी पुलाबाबत निर्णयात जाणीवपूर्वक वेळकाढूपणा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

- लोटली शेतकऱ्यांचा आरोप कायम
- एनजीटीच्या दंडाच्या निर्णयाचे स्वागत

**मडगाव, दि. ४ :** राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडून (एनजीटी) पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयावर लावण्यात आलेल्या दंडाचे लोटली परिसरातील शेतकऱ्यांनी सावधपणे स्वागत केले आहे. तथापि, बोरी पुलाच्या वादग्रस्त प्रकल्पावरील अंतिम निर्णय लांबणीवर टाकण्याचे प्रयत्न सुरूच असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

एनजीटी च्या ताज्या सुनावणीनंतर कारबेट, मस्कासाना आणि बेब्दो परिसरातील भाडेकरू शेतकऱ्यांची संघटना चालवणारे अध्यक्ष अल्बर्ट पिन्हेरो यांनी शेतकऱ्यांचे मत मांडले. आम्ही आमच्या वडिलोपार्जित खाजन जमिनीच्या संरक्षणासाठी कटिबद्ध आहोत, असे पिन्हेरो यांनी स्पष्ट केले.

त्यांनी सांगितले की, मंत्रालयाने जारी केलेली थ्रीडी अधिसूचना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचे उल्लंघन करते. सुप्रसिद्ध पी. व्ही. कृष्णमूर्ती प्रकरणाचा संदर्भ देत पिन्हेरो म्हणाले की, या अधिसूचनेला आवश्यक त्या पर्यावरणीय व वन मंजुरीचा अभाव आहे. त्यामुळे ही प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या शून्य ठरावी.

पिन्हेरो यांनी आरोप केला की, सरकारी अधिकारी मुद्दाम वेळकाढूपणा करत आहेत. आम्ही सादर केलेल्या स्पष्ट कायदेशीर व तथ्याधारित युक्तिवादांपुढे त्यांच्याकडे प्रतिवादच नाही, असे ते म्हणाले. मंत्रालयाने प्रकल्पात काही सुधारणा करण्याचे संकेत दिले असले, तरी अद्याप कोणताही सुधारित आराखडा प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयात सादर झालेला नाही, असेही त्यांनी नमूद केले.

प्रकल्पाच्या आकारमानाविषयी बोलताना पिन्हेरो म्हणाले, या प्रकल्पाचा व्याप १,५०,००० चौरस मीटरपेक्षा अधिक आहे. तो खाजन जमिनीवर प्रस्तावित आहे, जिथे शेती व मत्स्य व्यवसायाशिवाय अन्य कोणतीही क्रिया कायदेशीर नाही. त्यामुळे पर्यावरणीय मंजुरी अपरिहार्य आहे. पुलाची रचना स्टिल्टवर असल्याचे मान्य करताना त्यांनी सांगितले की, त्यासाठी होणारे रस्ते आणि वाहतूक ही जमिनीच्या वापरात अनावश्यक हस्तक्षेप घडवून आणतील.

मंत्रालयाने आपली बाजू मांडताना वनशक्ती प्रकरणाचा उल्लेख केला होता. याबाबत पिन्हेरो यांनी स्पष्ट केले की, त्या प्रकरणातील संदर्भ वेगळा असून त्याचा या प्रकल्पावर तात्काळ प्रभाव पडत नाही. पर्यावरणीय मंजुरीच्या अटी झाकण्यासाठी अधिकाऱ्यांकडून वनशक्ती प्रकरणाचा संदर्भ दिला जातो, पण तो खटला अद्याप न्यायप्रविष्ट आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

पिन्हेरो यांनी शेवटी शेतकऱ्यांना अद्याप त्यांच्या हक्कांची तात्पुरती दिलासा मदत न मिळाल्याबद्दल खंत व्यक्त केली. न्याय विलंबित झाला आहे, आणि तो आजही मिळालेला नाही, असे त्यांनी म्हटले. तरीही, शेतकऱ्यांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास कायम आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. आमचे खाजन शेतीसाठीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. कोणीही आमची भूमी हिरावून घेऊ शकत नाही,अशी जाहीर घोषणा त्यांनी केली.

दरम्यान, पुढील सुनावणीसाठी दीर्घ प्रतीक्षा लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये पान २ ▶

# भारत-पाकिस्तान तणाव वाढला : पाकिस्तानचे विशेष अधिवेशन

**नवी दिल्ली, दि. ४ :**

भारत-पाकिस्तान दरम्यान वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनी आज (सोमवार) संध्याकाळी ५ वाजता राष्ट्रीय असेंब्लीचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. हे अधिवेशन पाकिस्तानच्या संविधानाच्या कलम ५४(१) अंतर्गत राष्ट्राध्यक्षांनी बोलावले असून, सध्याच्या राष्ट्रीय सभेचे हे १६ वे अधिवेशन असेल. शनिवारी संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सल्लामसलत बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या अधिवेशनात भारताच्या संभाव्य आक्रमकतेचा निषेध करणारा ठराव मंजूर केला जाण्याची शक्यता आहे.

गेल्या महिन्यात पाकिस्तानचे उपपंतप्रधान व परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनीही भारताच्या अलीकडील कारवायांचा निषेध करणारा ठराव सभागृहात मांडला होता, जो एकमताने मंजूर करण्यात आला होता.२२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता, त्यापैकी बहुतांश पर्यटक होते. या घटनेनंतर दोन्ही देशांमध्ये तणाव वाढला आहे.



अमृतसर ग्रामीण पोलिसांनी पाकिस्तानसाठी गुप्त माहिती शेअर केल्याप्रकरणी पलक शेर मसीह आणि सूरज मसीह या दोन व्यक्तींना अटक केली आहे. या प्रकरणात अमृतसर मध्यवर्ती तुरुंगातील हरप्रीत सिंग या त्यांच्या संपर्कात असलेल्या व्यक्तीचीही चौकशी केली जात आहे.एसएसपी मनिंदर सिंग यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, अटक करण्यात आलेल्या दोघांनी त्यांच्या मोबाईल फोनवरून संवेदनशील ठिकाणांचे फोटो व व्हिडिओ पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थांना पाठवले होते.या प्रकरणी पोलिसांनी संबंधित आरोपींविरुद्ध एफआयआर दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

परराष्ट्र व्यवहार तज्ज्ञ रॉबिंदर सचदेवा यांनी भारत सरकारच्या पाकिस्तानमधून आयात बंदीच्या निर्णयाचे समर्थन केले असून, भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील नागरिकांनी पाकिस्तानवर बहिष्कार टाकावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.आता फक्त एकच घोषणा गरजेची आहे. पाकिस्तानवर बहिष्कार. भारत सरकारने हे पाऊल उचलले आहे, भारतातील आणि जगभरातील लोकांनीही याचे समर्थन केले पाहिजे. कोणत्याही देशाने पाकिस्तानमध्ये नवीन गुंतवणूक करू नये किंवा भागीदारी करु नये, असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान भारताने विकसित केलेल्या स्ट्रॅटोस्फेरिक एअरशिप प्लॅटफॉर्मच्या यशस्वी उड्डाण चाचण्या नुकत्याच पार पडल्या असून, या प्रणालीमुळे लष्कराची पाळत ठेवण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) अध्यक्ष समीर व्ही कामत यांनी सांगितले की, हे प्रोटोटाइप उड्डाण हवेपेक्षा हलक्या उंचीवरील प्लॅटफॉर्मच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, जे दीर्घकाळ हवेत राहू शकते.या चाचण्या पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर झाल्या आहेत .

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने अनेक पाकिस्तानी कलाकारांची सोशल मीडिया खाती ब्लॉक केली आहेत. यामध्ये फवाद खान, गायक आतिफ असलम, अभिनेत्री मावरा होकेन, आणि गायिका आबिदा परवीन यांचा समावेश आहे.वापरकर्त्यांना या खात्यांवर हे खाते भारतात उपलब्ध नाही. कायदेशीर विनंतीनुसार ही सामग्री ब्लॉक केली आहे, असा संदेश दिसत आहे. पान २ ▶

